ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १२ जानेवारी, १९५५ | अंक २

## विविध माहिती

**व्यापारवृद्धीसाठीं खटपट**—भारतानें रशिआपासून यंत्र-सामुग्री अधिक प्रमाणांत घ्यावी ह्या हेतूनें मुंबई येथें रशिआची एक शो-रूम उघडण्यांत येणार आहे. महालक्ष्मीच्या देवळाजवळ ती खोलण्यांत येईल. शेतीचीं अवजारें, मोटार-सायकल्स, मोटारी, लिनोटाइप मशीन्स, इत्यादि माल ह्या कायमच्या प्रदर्शनांत मांडण्यांत येणार आहे.

**सूर्यप्रकाशाच्या साह्यानें साखर**—सूर्यप्रकाशाचा उपयोग करून कार्बन डायॉक्साइड आणि पाणी ह्यांच्यापासून साखर आणि स्टार्च तयार करण्यांत कॅलिफोर्निआ विद्यापीठांतील एका संशोधकाला यश आलें आहे, असें समजतें. सूर्याच्या शक्तीचा औद्योगिक उपयोग करून घेण्याच्या मार्गावरील हें महत्त्वाचें पाऊल आहे, असें मत सदर संशोधकानें व्यक्त केलें आहे.

**गुळाच्या निर्यातीस परवानगी**—आंध्र राज्यांतून ३,००० टन गूळ परदेशीं पाठविण्यास भारतीय सरकारनें परवानगी दिली आहे. राज्यांत ४०,००० टन गूळ शिल्लक असल्यामुळें ह्यापेक्षा बराच अधिक गूळ निर्यात करण्याची मागणी करण्यांत आली होती. पण देशांतील गुळाची टंचाई लक्षांत घेऊन सरकारनें तीन हजार टनाच्या निर्यातीसच परवानगी दिली.

**जपान-इजिप्त व्यापारी वाटाघाटी**—इजिप्तमधील व्यापाऱ्यांचें एक प्रतिनिधी-मंडळ आणि जपानचें सरकार ह्यांच्यांत व्यापारी वाटाघाटी झाल्या. इजिप्तमध्यें जपाननें आपल्या अवजड यंत्रसामुग्रीचें प्रदर्शन भरविण्यासंबंधींहि बोलणीं झालीं, असें समजतें. इजिप्तच्या मार्गानें मध्यपूर्वेतील राष्ट्रांत जपानचा औद्योगिक माल खपविण्याच्या खटपटींत जपान आहे.

**कॉलेजसाठीं नवी इमारत**—हैद्राबादपासून १० मैलांवर हिमायतनगर येथें शेतकी कॉलेजसाठीं नवी इमारत बांधण्यांत येत आहे. कॉलेजची कोनशिला डॉ. राधाकृष्णन्‌ ह्यांचे हस्तें ता. ६ रोजीं बसविण्यांत आली. इमारतीसाठीं १० लाख रुपये खर्च येणार असून सध्या उस्मानिआ विद्यापीठाच्या इमारतींत असणाऱ्या शेतकी-कॉलेजसाठीं ती बांधण्यांत येत आहे.

**बुद्धाच्या जीवनावर बोलपट**—गौतम बुद्धाच्या जीवनावर आधारलेला बोलपट काढण्याचें सुप्रसिद्ध अमेरिकन कंपनी, मेट्रो-गोल्डविन-मेयर, हिच्या चालकांनीं ठरविलें असल्याचें समजतें. चित्रपटकथेचे लेखक मि. रॉबर्ट ॲन्ड्र्यूज हे बुद्धाच्या चरित्राची माहिती गोळा करण्याचें काम गेलीं दोन वर्षें करीत आहेत.

**हैद्राबाद राज्यांत खताचा कारखाना**—हैद्राबाद राज्यांत खताचा नवा कारखाना काढण्याची शक्यता अजमावण्यासाठीं भारतीय सरकारचे कांहीं विशेषज्ञ लवकरच राज्याला भेट देणार आहेत.

**महाराष्ट्रासाठीं विकासयोजना**—सरदार वल्लभभाई पटेल स्मारक-निधि कमिटीच्या महाराष्ट्र-शाखेनें महाराष्ट्राच्या विकासासाठीं ३२ लाख रुपये खर्च येणारी विकास-योजना आखली आहे, असें समजतें. मागासलेल्या भागांत आणि आदिवासी रहात असलेल्या प्रदेशांत विहिरी खणणें, रस्ते बांधणें, शाळा बांधणें, इत्यादि कार्यांसाठीं वरील रक्कम खर्च करण्यांत येईल.

**सौराष्ट्रांतील क्षयरोगविरोधी मोहिम**—सौराष्ट्र सरकारनें क्षयरोगाविरुद्ध लस टोचण्याची मोहीम चालू केली आहे. क्षयरोगाची भावना आहे किंवा काय हें पहाण्यासाठीं २०,५४५ लोकांची चांचणी करण्यांत आली व त्यांतील ६,२२२ लोकांना क्षयरोगप्रतिबंधक लस टोचण्यांत आली. १४० विहिरींमधील पाणी जंतुघ्न द्रव्य टाकून आरोग्यकारक करण्यांत आलें.

**विद्यार्थिनींसाठीं वसतिगृह**—चालू वर्षीं अहमदाबाद शहरांत विद्यार्थिनींसाठीं एक वसतिगृह बांधण्यांत यावयाचें आहे अशी माहिती मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री श्री. दिनकरराव देसाई ह्यांनीं सांगितली. वसतिगृहाच्या इमारतीसाठीं ३ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकीं २ लाख रुपये सरकार देणार असून बाकीची रक्कम सार्वजनिक रीत्या गोळा करण्यांत येणार आहे.

**तुर्कस्थानसाठीं भारतीय बोलपट**—भारतीय बोलपटांना तुर्कस्थानांत अधिक मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुप्रसिद्ध निर्माते श्री. करदार हे करीत आहेत. तुर्कस्थानमधील लोकांनीं भारतीय बोलपटांविषयीं जिज्ञासा दाखविली असून तुर्कस्थानांतील चित्रगृहांत दाखविण्यांत आलेले कांहीं हिंदी बोलपट चांगलेच यशस्वी ठरले आहेत.

**राज्यांतर्गत विक्रीकर**—आग्रा येथील सुमारें शंभर व्यापाऱ्यांवर मद्रास सरकारनें १९५२ सालांतील विक्रीकर भरण्यासंबंधीं नोटिसा बजावल्या आहेत. १९५२ सालांत ह्या व्यापाऱ्यांनीं आग्र्याहून मद्रासला जो माल पाठविला त्यावरील विक्रीकराच्या वसुलीसाठीं नोटिसांनीं मागणी करण्यांत आली आहे.

**मद्यपानाचे फ्रेंच बळी**—बेसुमार दारू पिण्यामुळें यकृतांत बिघाड उत्पन्न होतो हें प्रसिद्ध आहे. फ्रान्सचे आरोग्यमंत्रि मि. मॉंटील ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, १९५३ सालीं फ्रान्समध्यें अतिशय मद्यपानामुळें यकृत बिघडून १३,००० फ्रेंच नागरिक मृत्यु पावले.

**अमेरिकेची लोकसंख्या**—१९५४ च्या आरंभीं अमेरिकेची लोकसंख्या सुमारें १६,३९,००,००० असावी, असें अमेरिकेच्या सेन्सस ब्यूरोतर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. १९५० मध्यें झालेल्या शिरगणतीपेक्षा ही लोकसंख्या १,२५,००,००० नीं जास्त आहे. १९५४ मध्यें ३७,००,००० नीं लोकसंख्या वाढली.

**पेट्रोलच्या नळाची मालकी**—सुएझ व कायरो ह्यांच्या दरम्यान पेट्रोलची वहातूक करण्यासाठी ब्रिटिश लष्करानें नळ टाकले होते. ह्या नळांची मालकी इजिप्तला देण्याच्या करारावर ब्रिटन व इजिप्त ह्यांनीं नुकत्याच सह्या केल्या. नळ दुरुस्त ठेवून त्यांचा उपयोग करण्यासंबंधीं शेल कंपनीबरोबर ह्याच वेळीं नवा करार इजिप्तनें केला.

**पाकिस्तानला तेलाचा शोध**—पाकिस्ताननें मैमनसिंग व कोमिल्ला ह्या भागांत भूमिगत तेलाचे साठे शोधून काढण्यासाठीं पहाणी चालविली आहे. पुढील वर्षाच्या प्रारंभीं पाकिस्तान पेट्रोलिअम लि. ही कंपनी सिल्हेट येथें तेलाच्या विहिरी खणण्यास सुरवात करील, असें समजतें.

**वेरूळची लेणीं पहाण्यासाठीं गर्दी**—अजिंठा व वेरूळ येथील सुप्रसिद्ध लेणीं पाहण्यासाठीं गेल्या कित्येक वर्षांत झाली नव्हती येवढी गर्दी गेल्या नाताळांत झाली होती. डिसेंबर २७ ह्या एकाच दिवशीं ७,००० प्रवासी लेणीं पहाण्यासाठीं गेले. खाजगी व सरकारी बसेसकडून ह्या एकाच दिवशीं ८५० रुपये चाकपट्टी वसूल करण्यांत आली.

**रोटरी क्लबाचें काम हिंदींत**—जबलपूर येथील रोटरी क्लबानें महिन्यांतून एका तरी सभेचें काम हिंदींत चालविण्याचें ठरविलें आहे. भारतामधील रोटरी क्लबांपैकीं ह्याच क्लबानें आपलें कामकाज हिंदींत चालविण्याचा निर्णय प्रथम घेतला आहे.

**न्यूयॉर्कमध्यें भारताची शोरूम**—न्यूयॉर्कमधील भारताचे कॉन्सल-जनरल श्री. सिंग ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं भारतीय सरकारनें न्यूयॉर्क येथें भारतीय मालाची माहिती करून देण्यासाठीं एक शोरूम उघडण्याची सूचना मान्य केली आहे. भारतांत तयार होणारा विविध प्रकारचा माल ह्या जागेंत मांडण्यांत येणार आहे.


**२५ लाखांची नुकसानभरभाईची मागणी**—गेल्या सप्टेंबर महिन्यांत हैद्राबाद राज्यांत जनगांव ह्या ठिकाणीं मोठा रेल्वे अपघात झाला होता. अपघातांत मृत्यु पावलेल्यांच्या नातलगांकडून २५ लाख रुपयांच्या नुकसानभरपाईच्या मागण्या क्लेम्स कमिशनकडे आल्या आहेत, असें समजतें. ह्या अपघातांत एकूण १२५ उतारू दगावले होते.

**ब्रिटनकडून कर्जाची फेड**—दुसऱ्या महायुद्धांत आलेल्या कर्जाच्या फेडीचा वार्षिक हप्ता म्हणून ब्रिटन अमेरिकेला १९५५ च्या आरंभीं सुमारें १३,००,००;००० डॉलर्स देईल असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. हा हप्ता देऊनाहि ब्रिटनचें कांहीं कर्ज शिल्लकच राहील. ब्रिटननें कॅनडाला परत करावयाच्या कर्जाचाहि समावेश ह्या वार्षिक हप्त्यांत करण्यांत येत असतो.

**ग्लायडर्स तयार करणार**—हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरी, बंगलोर, ही कंपनी लवकरच ग्लायडर्स तयार करण्यास प्रारंभ करील, असें समजतें.


किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक

हा चरक चालविण्यास ८।१७ हॉ. पॉ. एंजिन लागते. दरेक तासास १२०० ते १५०० पौंड ऊंस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे



कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.
—सविस्तर माहितीसाठीं लिहा.—
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
पृ. सं. १६८ ★ किंमत ३॥ रु.

" आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. "

ग. वा. मावळंकर
लोकसभेचे अध्यक्ष
( " कण आणि क्षण " च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा. )

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.
* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार-SANCOSOP
वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.
ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १२ जानेवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी कापडाची ब्रिटनकडे निर्गत

लँकेशायरच्या गिरणीमालकांनीं तेथील बोर्ड ऑफ ट्रेडकडे शिष्टमंडळ पाठवून, हिंदी कापडाच्या आयातीवर नियंत्रणें बसविण्याची मागणी केली आहे. 'मँचेस्टर गार्डियन' ह्या वृत्तपत्रानें ह्या प्रसंगास अनुसरून श्री. एन. एन. वाडिया ह्यांचा वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारा एक लेख प्रसिद्ध केला आहे; आणि स्वतः अग्रलेखांत मँचेस्टरच्या गिरणीमालकांना जरा सबुरीचा सल्ला दिला आहे.

ग्रेटब्रिटनमधील कापडाची आयात वाढली आहे, हें खरें आहे. पण इतर देशांच्या कापडाची जागा हिंदी कापडानें घेतली आहे, अशी वस्तुस्थिति आहे. हिंदी कापड ग्रेट ब्रिटनमध्यें आयात केलें जातें, त्यावर आणखी क्रिया करून तें तेथून दुसरीकडे निर्गत केलें जातें. ग्रेट ब्रिटनमधील गिरण्या कापसासाठीं परदेशांवर अवलंबून आहेत, तशी भारतांतील गिरण्यांची परिस्थिति नाहीं. कच्चा माल भारताला स्वदेशांतच उपलब्ध आहे, हा काय भारताचा दोष झाला ?

लँकेशायरची मुख्य तक्रार अशी कीं, हिंदी कापडाला ग्रेट ब्रिटनमध्यें जकात पडत नाहीं, पण ब्रिटिश कापडाला मात्र भारतांत ६०–८०% इतकी जबर जकात पडते. ओटावा करारानें दिलेली जकातविषयक सवलत भारत आज २० वर्षें उपभोगीत असताहि, गेल्या पांच वर्षांतच भारताला त्याचा फायदा मिळूं लागलेला आहे. ह्यापूर्वी लँकेशायरनें तक्रार न करण्याचें कारण, कोरियन युद्धामुळें तेथील सर्व गिरण्यांना काम होतें. १९५० व १९५१ मध्यें १९५४ पेक्षा ज्यास्त हिंदी कापड ग्रेट ब्रिटननें आयात केलेलें होतें. १९५२ मध्यें भारत सरकारनें कापडाच्या निर्गतीवर पट्टी बसविली, त्यामुळें कापडाची निर्गत कमी झाली. १९५१ मध्यें १०.९ कोटी चौरस वार कापड निर्गत झालें होतें, त्याचा आंकडा १९५२ मध्यें १.७ कोटी चौरस वार व १९५३ मध्यें १.६ कोटी चौरस वार असा झाला. १९५४ चे प्रारंभीं ही पट्टी रद्द करण्यांत आल्यापासून निर्गतीस पुनः चालना मिळाली आहे, परंतु त्यापासून निर्गतवाल्यापेक्षा आयातवाल्यांनाच ज्यास्त फायदा मिळालेला असला पाहिजे.

भारत सरकारनें ब्रिटिश कापडावर जी जकात बसविलेली आहे, तिचा उद्देश उत्पन्न मिळविणें हा आहे; तिचें स्वरूप संरक्षक नाहीं. त्याच पातळींतील इतर जिनसांवरील जकातींपेक्षा कापडावरील जकात भारी नाहीं. ब्रिटिश कापडाचा दर्जा उच्च असल्यानें त्याची किंमतहि अधिक असते. त्यामुळें त्याला भारतांत बाजारपेठ मर्यादितच रहाणार, हें उघड आहे.

केवळ कापडापुरताच विचार करून भागणार नाहीं; ब्रिटिश सरकारला त्या देशाच्या सर्वांगीण व दीर्घकालीन हिताचा विचार करावा लागेल. भारत आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें फक्त कापडाचाच व्यापार चालत नाहीं. गेल्या सात वर्षांत भारतानें ग्रेट ब्रिटनकडन ९९३ कोटी रुपयांचा माल घेतला व त्या देशांत ९१२ कोटी रुपयांचा माल विकला. भारताच्या औद्योगिक विकासाबरोबर ब्रिटिश यंत्रसामुग्री वगैरे भारतांतील खप वाढत जाईल आणि लँकेशायरच्या गिरण्यांचें होणारें थोडेंफार नुकसान इतरत्र भरून निघेल. परंतु, लँकेशायरच्या तक्रारीस भलतें महत्त्व देऊन ब्रिटिश सरकारनें भारताला दुखविलें, तर त्याचा परिणाम ग्रेट ब्रिटनच्या हिताचा होणार नाहीं, असें सुचविण्यांत येत आहे. हिंदी व ब्रिटिश कारखानदारांचे संबंध सलोख्याचे रहाण्याचें महत्त्व 'मँचेस्टर गार्डियन'नें आग्रहानें प्रतिपादलें आहे.

## काम न करणारे, पण खुर्चीस चिकटून बसणारे बँक नोकर

### ट्रायब्यूनलचा बँकेविरुद्ध निवाडा

१६ एप्रिल, १९५१ रोजीं दिल्ली येथील पंजाब नॅशनल बँकेच्या नोकरांनीं 'लेखणी खाली' बैठा संप केला, म्हणून बँकेनें त्यांना कामावरून दूर केलें. त्यापैकीं १३६ नोकरांना बँकेनें भर पगारावर कामावर घेतलें पाहिजे, असा लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें हुकूम केला आहे. बाकीच्या १४ नोकरांनीं इतर गुन्हे केले होते, ते पुनः कामावर घेतले जाण्यास पात्र ठरले नाहींत. "पोलिसांनीं मध्यें पडून अटकेची धमकी देईपर्यंत नोकरांनीं आपली खुर्ची सोडूं नये, अशी बँकनोकरांच्या फेडरेशनची सक्त ताकीद होती. तेव्हां, बँकअधिकाऱ्यांनीं सांगताक्षणीं नोकरांनीं आपल्या जागा सोडल्या, हें म्हणणें आम्हांला विश्वासार्ह वाटत नाहीं. 'लेखणी खाली' संप करणारांनीं काम बंद ठेवलें, पण त्यांनीं जागा सोडली नाहीं, अशी आमची खात्री आहे. त्यांनीं त्याखेरीज दुसरें कोणतेंहि आक्षेपार्ह वर्तन केल्याचा, आरोळ्या मारल्याचा किंवा हिंसेचा प्रयत्न केल्याचा, पुरावा नाहीं. बँकअधिकाऱ्यांनीं बसण्याची जागा खाली करून देण्यास नोकरांना सांगितलें व त्यांनीं तें ऐकलें नाहीं, तर तें वर्तन बेकायदा होतें काय ? असा प्रश्न उपस्थित होतो. 'लेखणी खाली' संपाचा जागा न सोडणें हा एक महत्त्वाचा भाग आहे आणि हा संप १९४७ च्या इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टाच्या व्याख्येंत बसणारा आहे. म्हणून, खुर्चीवर बसून राहणें बेकायदा होत नाहीं. इतरहि दुसऱ्या कायद्याखालीं तो गुन्हा ठरत नाहीं. म्हणून, त्यांना पुनः नोकरीवर न घेण्यास तें कारण पुरेसें नाहीं. अमेरिकेंत काम मुद्दाम मंद गतीनें करणें बेकायदा आहे; भारतांत तसेंच समजणें श्रेयस्कर होणार नाहीं. येथें मालकवर्ग व नोकरवर्ग एकाच पातळीचे नाहींत. कित्येक उद्योगधंद्यांत कामगारांना वाजवी वेतन मिळत नाहीं आणि अजूनहि मालक कामगारांना पिळून आपला फायदा वाढवीत आहेत. मालकांची स्थिति अतिशय भक्कम आहे, पण कामगार असंघटित असून कामगारांच्या संघांची प्रगति अद्याप झालेली नाहीं. म्हणून अमेरिकन निर्णय येथें अंधळेपणानें लागू होणार नाहीं." असा ट्रायब्यूनलनें निवाडा केला. वकीलखर्च, इत्यादींसाठीं नोकरांना ३०,००० रु. देण्यास ट्रायब्यूनलनें हुकूम केला.

## साखरेचे सहकारी कारखाने

भारताचे अन्न व शेतकी-मंत्री श्री. अजितप्रसाद जैन ह्यांनीं पुणें येथील शेतकी कॉलेज व इतर कांहीं संस्था ह्यांना भेटी दिल्या. देशांतील अन्नधान्याची परिस्थिति आणि साखरेचे सहकारी कारखाने ह्या विषयासंबंधीं त्यांनीं ह्या प्रसंगीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, देशांतील साखरेच्या ग्राहकांची संपूर्ण गरज भागविण्यासाठी सहकारी तत्त्वावर चालविले जाणारे साखरेचे अधिक कारखाने स्थापन होणें आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्यें साखरेचे ११ नवीन सहकारी कारखाने काढण्यास सरकारनें परवानगी दिलीच आहे. सहकारी तत्त्वावर निघणारे कारखाने यशस्वी करून दाखविणें हें आतां लोकांवर अवलंबून आहे. ह्या कारखान्यांची प्रगति कशी काय होत आहे इकडे सरकार लक्ष ठेवीत आहे. मंजूर करण्यांत आलेले साखरेचे कारखाने कसे काय चालतात ह्यावर अशा प्रकारचे अधिक कारखाने काढावेत कीं नाहीं हा प्रश्न अवलंबून राहील. अन्नधान्याच्या बाबतींत भारतानें एकंदरीनें स्वयंपूर्णता गांठली असली तरी अजून साखर, गहूं आणि ब्रह्मदेशाचा तांदूळ ह्यांची आयात मोठ्या प्रमाणावर करावी लागणार आहे. आयात तांदुळाचा सांठा करून तो अडीअडचणीच्या वेळीं उपयोगी पडावा म्हणून राखून ठेवण्यांत येईल. गहूं आणि साखर हे पदार्थ मात्र लोकांना विकत घेता यावेत म्हणून खुले करण्यांत येतील. शेतकी कॉलेजमधील प्रयोगशाळेंत पिकांवर पडणाऱ्या रोगांसंबंधीं संशोधन करण्यांत येत आहे. ह्या प्रयोगशाळेंत चाललेलें कार्य पाहण्याची संधि श्री. जैन ह्यांनीं घेतली. त्याचप्रमाणें पुणें येथें सरकारनें चालविलेल्या मेंढ्यांच्या पैदाशीच्या केंद्रालाहि त्यांनीं भेट दिली.

## वाळवंटाचें प्रसरण थांबविण्याची योजना

उत्तर-प्रदेश आणि राजस्थान ह्यांच्या सरहद्दीवर असलेलें वाळवंट पसरूं नये म्हणून सरहद्दीवर जंगलाची लागवड करण्याची एक योजना मध्यवर्ती सरकारनें मंजूर केली आहे. जंगलाची लागवड केल्यानें जमिनीची ूप थांबवण्यास चांगली मदत होते. उत्तर-प्रदेश सरकारतर्फे ही योजना सुचविण्यांत आली असून तीसाठी ३६,२०,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. उत्तर-प्रदेश व राजस्थान ह्यांच्या सरहद्दीवरील वालुकामय प्रदेशांत ५ मैल रुंदीचा अरण्यविस्तार तयार करण्याच्या स्वरूपाची ही योजना आहे. ह्या भागांतील जमीन कोणत्या लवकर वाढणाऱ्या झाडांना अनुकूल आहे तें अजमावण्यासाठीं जंगलविषयक तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत येत आहे. डेहराडून येथील जंगलविषयक संशोधन खातें ह्या बाबतींत खास संशोधन करीत आहे. सेंट्रल सॉइल कॉन्झरव्हेशन बोर्डानें उत्तर-प्रदेश सरकारला ह्या कामासाठीं १२,३०,००० रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जाऊ रकमेशिवाय आणखी आर्थिक मदत देण्याचाहि विचार सरकार करीत आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा काल संपण्यापूर्वीच ह्या कामास प्रारंभ करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. डेहराडून येथें भरलेल्या चौथ्या जागतिक जंगल कॉंग्रेसला इस्राइल देशाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. डगूर हे जंगलविषयक तज्ज्ञ आले होते. राजस्थानमधील वाळवंटाचा खास अभ्यास करून, तें अधिक पसरूं न देण्याविषयीं काय उपाय योजावे तें सुचविण्याची कामगिरी भारत सरकारनें त्यांच्यावर सोंपविली आहे. डॉ. डगूर ह्यांनीं जोधपूर येथील संशोधन शाळेंत आपल्या कामाला आरंभहि केला आहे. त्यांचा अहवाल बहुधा फेब्रुआरी अखेर तयार होईल.

## पाकिस्तानमधील जलविद्युत् केंद्र

पाकिस्तानी पंजाबांत एक मोठें जलविद्युत् केंद्र बांधण्यास लवकरच प्रारंभ होणार आहे. ह्या प्रचंड केंद्रासाठीं सुमारें १०,००,००,००० रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. वास्तविक ह्या विद्युत्केंद्राला एकच केंद्र असें म्हणतां येणार नाहीं. कारण पाण्याच्या गतीनें वीज निर्माण करण्याचीं पांच पृथक् वीजगृहें बांधून त्या सर्वांचें केंद्रीकरण करण्याच्या स्वरूपाची ही योजना आहे. सर्व विद्युत्-केंद्रांत मिळून अंदाजें ८९,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. योजनेला पाकिस्तान सरकारच्या नियोजन-समितीनें मान्यता दिलेली आहे. पांच विद्युत्-निर्मिति-केंद्रांपैकीं मंगला हेडेड प्रोजेक्ट हें केंद्र प्रमुख असून ह्या एकट्याच केंद्रांत ४५,००० किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. उरलेली वीज इतर चार केंद्रांतून निर्माण करण्यांत येणार आहे. विजेची वाहतूक आणि तिचें वांटप कशा प्रकारानें करावें ह्याबद्दल विचार चालू आहे. वरील वीज-निर्मिति-केंद्रांत निर्माण होणाऱ्या विजेचा वापर शेतकीचा विकास व नव्या उद्योग-धंद्यांची स्थापना ह्या बाबींकडे करण्यांत येणार आहे. भारत व पाकिस्तान आपआपल्या परीनें आर्थिक प्रगति करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतर करीत आहेत. राष्ट्रें म्हणून हे दोन्हीं देश स्वतंत्र असले तरी त्यांच्यांतील भौगोलिक साम्य उघड लक्षांत येणारें आहे. त्यामुळें दोन्हीं देशांचे आर्थिक प्रगतीचे तांत्रिक मार्ग कमी-अधिक प्रमाणांत सारखेच असणें अपरिहार्य आहे.

## लिपझिग येथील औद्योगिक प्रदर्शन

पूर्व-जर्मनींतील लिपझिग ह्या शहरीं दरवर्षी एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येत असतें. चालू सालीं हें प्रदर्शन ता. २७ फेब्रुवारी ते ९ मार्चपर्यंत भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनाचे डायरेक्टर मि. ऑटो माइनहार्ट्ट हे मुंबईला आले असतांना त्यांनीं भारताच्या दृष्टीनें ह्या प्रदर्शनाचें महत्त्व सांगितलें. ते म्हणाले कीं, भारतामधील उद्योगधंदेवाल्यांनीं व व्यावसायिकांनीं ह्या प्रदर्शनांत भाग घ्यावा अशी आमची इच्छा आहे. भारत आणि पूर्व-जर्मनीचे डेमोक्रॅटिक रिपब्लिक ह्यांच्या दरम्यान जो व्यापारी करार झाला आहे, तो समाधानकारक रीतीनें अंमलांत आणण्याच्या कामीं प्रदर्शनांत भाग घेतल्यानें फार महत्त्वाची मदत होण्यासारखी आहे. दुसरें महायुद्ध संपल्यापासून लिपझिगमध्यें भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत भाग घेण्याचा भारताचा हा पहिलाच प्रसंग होईल. ह्या निमित्तानें जर्मनीशीं असणारा आपला व्यापार वृद्धिंगत करण्याची संधीहि भारताला मिळेल. गेल्या सप्टेंबरमध्यें भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनांत २५·५ कोटी पौंडांची उलाढाल करण्यांत आली. प्रदर्शनांत ३६ राष्ट्रांनीं भाग घेतला होता. मि. ऑटो माइनहार्ट्ट ह्यांनीं सदर प्रदर्शनासंबंधीचा एक रंगीत अनुबोधपट बरोबर आणला असून त्यांत गतवर्षीच्या प्रदर्शनाचें चित्रीकरण करण्यांत आलेलें आहे. हा चित्रपट मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि मोठ्या शहरांतून दाखविण्याचा त्यांचा विचार आहे. पूर्व-जर्मनींत भरणारें हें प्रदर्शन भारताला आणखी एका दृष्टीनें महत्त्वाचें वाटण्यासारखें आहे. पूर्व-युरोपांतील राष्ट्रें (झेकोस्लोव्हाकिया सोडून) औद्योगिक दृष्ट्या मागासलेलीं होतीं. दुसऱ्या महायुद्धानंतर तीं रशिअन गटांत गेलीं. त्यांची युद्धोत्तर कालांतील प्रगति प्रदर्शनावरून अजमावणें शक्य होईल.

## अमेरिकेस जाऊं इच्छिणाऱ्या तरुण शेतकऱ्यांसाठी

समाजविकास योजना व राष्ट्रीय विकासकार्य–योजना यांच्या क्षेत्रांतील तरुण शेतकऱ्यांचा एक गट अमेरिकेस पाठविण्यासाठी निवडावयाचा आहे. अमेरिकेंतील नॅशनल ४ एच्. क्लब फौंडेशनतर्फे सुरू करण्यांत आलेल्या इंटर नॅशनल फार्म यूथ एक्स्चेंज कार्यक्रमानुसार १५ एप्रिलला किंवा त्या सुमारास हे तरुण अमेरिकेस जाण्यास निघतील. अमेरिकन शेतकरी कुटुंबांत ५–६ महिने राहून व त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम करून हे तरुण अमेरिकन शेती व अमेरिकन शेतकरी यांच्याबद्दलची माहिती मिळवितील. भारतांत आपल्या शेतांवर परत आल्यावर हे तरुण ४ एच्. क्लबच्या धर्तीवर तरुण शेतकऱ्यांचे क्लब काढतील व आपल्या भागांतील शेतकऱ्यांचें जीवन सुधारण्याचा प्रयत्न करतील.

गेल्या वर्षी एप्रिल महिन्यांत २५ तरुण शेतकरी अमेरिकेस गेले होते व २६ नोव्हेंबरच्या सुमारास ते परत आले. १९५५ चा कार्यक्रम हा त्यापुढील कार्यक्रम आहे. या तरुणांनीं आपल्या अमेरिकन यजमानांबरोबर प्रत्यक्ष शेतावर काम केलें व त्यांच्या समाजजीवनाची माहिती मिळविली.

१९५५ च्या कार्यक्रमाखाली अमेरिकेस जाऊं इच्छिणाऱ्या तरुणांचा जन्म १ जानेवारी, १९२७ ते १ जानेवारी, १९३५ च्या दरम्यान झालेला असावा. त्यांची शरीरप्रकृति उत्तम व वर्तणूक चांगली असावी. तसच त्यांना इंग्रजी बोलतां आलें पाहिजे व भारतांत परत आल्यावर ग्रामीण भागांतील तरुणांच्या संघटना त्यांना चालवितां आल्या पाहिजेत. ज्यांची लहान किंवा मध्यम आकाराची शेती असेल अशा शेतकरी तरुणांना प्रथम पसंति देण्यांत येईल. अर्जदार कॉलेजांत असतां कामा नये व त्यानें या कार्यक्रमाचा उपयोग अमेरिकन विद्यापीठांतून प्रवेश मिळविण्यासाठी किंवा भारतांत परत आल्यावर नोकरी मिळविण्यासाठी करतां कामा नये.

नवी दिल्ली ते न्यूयॉर्कपर्यंतच्या प्रवासाचा ½ खर्च उमेदवाराला स्वतःला करावा लागेल. हा खर्च जवळ जवळ २,००० रुपयांपर्यंत येईल. उरलेला खर्च नॅशनल ४ एच्. क्लब फौंडेशनतर्फे देण्यांत येईल. सदरहू संस्था खाजगी असून वॉशिंग्टन येथील युनायटेड स्टेट्स् ॲग्रिकल्चरल एक्स्टेंशन सर्व्हिसला जोडलेली आहे. या तरुणांचा मोफत आरोग्य विमा उतरविण्यांत येईल. अमेरिकेंतील शेतकरी कुटुंबें या तरुणांच्या राहण्या-जेवणाची मोफत व्यवस्था करतील. पण प्रत्येक भारतीय तरुणानें आपल्याबरोबर कमींत कमी १,२०० रुपये नेले पाहिजेत; शक्य तों त्यांनीं २,००० रुपये न्यावेत. कपडे, करमणूक, कॅमेरा, फिल्म्स्, स्थानिक प्रवास व इतर प्रासंगिक खर्चासाठी त्यांना ही रक्कम लागेल.

अर्जाचे फॉर्म संबंधित राज्याचे डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर किंवा श्री. आर. एल. मेहता, आय. ए. एस. डेप्युटी सेक्रेटरी, अन्न व शेतकी खातें, नवी दिल्ली यांच्याकडे स्वतःच्या पत्त्याचें पाकिट पाठविल्यास मिळूं शकतील.

---

**भारताची कापसाची आयात**—इजिप्तमधून कापसाची आयात करणाऱ्या देशांत भारताचा क्रमांक ह्या वर्षीच्या पहिल्या नऊ महिन्यांतील आंकड्यांवरून पहिला लागतो, असें समजतें. ह्या कालांत इजिप्तनें जितका कापूस निर्यात केला त्यापैकी १५ टक्के भारतानें घेतला. भारतानंतर फ्रान्स व ब्रिटनचा अनुक्रम लागतो.

### दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

वरील कंपनीस ३० जून, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी ४,९३,७५८ रु. घसारा काढून, १,५०,००० रु. ची कराची तरतूद करून व १,५००० रु. कॉन्टिजन्सी रिझर्व्हमध्यें टाकून १,५०,६१२ रु. निव्वळ नफा राहिला. ५% करमाफ डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें आहे, व ३०,००० रु. रिझर्व्ह फंडांत वर्ग करण्यांत आले आहेत. सर्व प्रकारच्या गिअर्ड हेड लेथ्सच्या उत्पादनांत कंपनीनें आणखी प्रगति केली. अहवालाचे वर्षी दोन नवे आकार सुरू करण्यांत आले. त्यामुळें, उत्पादनाची विविधता आणखी वाढली आहे. कंपनीच्या वार्षिक सभेचे वेळीं चेअरमन, श्री. के. नारायणस्वामी, आय.ए.एस. ( सरकारी डायरेक्टर ) हे म्हणाले, कीं कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा झाला व वहातुकीची व्यवस्था सुधारली तर धंदा वाढण्यास फार मदत होईल. मशीनटूल्सच्या कारखान्यांना उत्पादनाचीं क्षेत्रें वाटून देणें इष्ट होईल, असेंहि ते म्हणाले. हें करतांना घ्यावयाची दक्षताहि त्यांनीं स्पष्ट केली. निर्गतीच्या व्यापारपेठा काबीज करण्यासाठी प्रारंभींच्या काळांत तरी सरकारनें साहाय्य करावें, असें त्यांनीं सुचविलें. कोकचा पुरवठा सतत व्हावा ह्यासाठी सरकारनें स्वतःच कोकच्या भट्ट्या सुरू कराव्या असेंहि ते म्हणाले.

कंपनीनें स्थापनेपासून आतांपर्यंत १३ वर्षांत १० वेळां डिव्हिडंड दिलें आहे, त्याची सरासरी ५·७% पडते. कंपनीचें वसूल भांडवल २२ लक्ष, ७ हजार रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ५ लक्ष, १४ हजारांचे आहेत. काढलेला घसारा ३६ लक्ष, २५ हजार रुपये आहे. एकूण ताळेबंद ९० लक्ष रुपयांचा आहे. ( मॅनेजिंग एजंटस्: किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी )

### सुगंधित रेल्वे स्टेशन्स

पॅरीस येथील ट्यूब रेल्वेचीं स्टेशनें सुगंधित करण्याची कल्पना अंमलांत आली आहे. आगगाड्यांवर बसविण्यांत आलेल्या योजनेच्या साहाय्यानें स्टेशनच्या इमारतींवर सुगंधयुक्त फवारे उडविण्यांत येतात. त्यांत जंतुनाशक द्रव्येंहि मिसळलेलीं असतात. एकाच सुगंधाचा कंटाळा येऊं नये, म्हणून निरनिराळे सुगंध वापरण्यांत येतात. सुगंधित वातावरणामुळें ट्यूब रेल्वेकडे ज्यास्त उतारू आकर्षित होतील, अशी अपेक्षा आहे.

---

### सेव्हिंग्ज बँक खातेदारांना नव्या सवलती

कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील जनरल पोस्ट ऑफिसांतील व न्यू दिल्ली येथील हेड पोस्ट सेव्हिंग्ज बँकेंतील खातेदारांना ह्यापुढें आठवड्यांत दोनदां पैसे काढतां येतील. आगाऊ सूचना न देतां आठवड्यांत १,००० रुपयांपर्यंत रकमा काढण्यास परवानगी राहील.

---

### इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण

इंपीरिअल बँकेच राष्ट्रीयीकरण करण्याच्या योजनेवर भारत सरकारनें रिझर्व्ह बँकेचें मत मागितलें आहे. त्यासाठी बँकेच्या बोर्डाची खास सभा दि. २४ रोजीं मुंबई येथें भरणार आहे.

### सांगली येथें इंपीरिअल बँक

इंपीरिअल बँकेची सांगली येथें एक शाखा लवकरच उघडण्यांत येणार आहे. सरकारी वाड्याच्या तटाचे आंतील ट्रेझरी इमारतीचा तळमजला बँकेच्या शाखेसाठी देण्यांत आला आहे.

## पुणें सें. को. बँक स्टाफ को. क्रे. सो.चा रौप्यमहोत्सव

**" मध्यमवर्गाच्या महत्त्वाच्या स्थानाकडे दुर्लक्ष नको "**

पुणें सें. को. बँक स्टाफ को क्रे. सोसायटी लि पुणें या संस्थेचा रौप्यमहोत्सव दिनांक ३१-१२-५४ रोजीं सायंकाळीं श्री. दा. वि. गोखले यांचे अध्यक्षतेखालीं पुणें सें को. बँकेच्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. यासमयीं संस्थेचे बहुतेक आजी व माजी सभासद, सेंट्रल बँकेचे हल्लींचे व पूर्वींचे चेअरमन व डायरेक्टर्स, पुण्यांतील प्रमुख संस्थांचे चालक व सहकारी क्षेत्रांतील प्रमुख व्यक्ती फार मोठ्या संख्येनें उपस्थित होते. यावेळीं संस्थेनें गेल्या २५ वर्षांत केलेल्या आपल्या कामगिरीचा आढावा घेतलेला रौप्यमहोत्सव ग्रंथ प्रसिद्ध केला. या समयीं श्री. द. दि. चितळे, श्री. ना. वि. पांडव, श्री. वि. ज. करंदीकर, श्री. ग. र. तुळशीबागवाले, श्री. बा. चिं. भानू व रा. सा. य. द. खोले यांनीं समयोचित भाषणें करून संस्थेस आशिर्वाद दिले. अध्यक्ष, श्री. बाबूराव गोखले यांनीं यावेळीं सहकारी चळवळींसंबंधींचे आपले कांहीं विचार प्रकट केले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या गोरवाला कमिटीच्या वृत्तांतांतील कांहीं वाक्यांकडे श्रोत्यांचें त्यांनीं लक्ष वेधून हल्लीं मध्यमवर्गीयांची आर्थिक परिस्थिति कशी केविलवाणी झाली आहे याचें विवरण त्यांनीं स्पष्ट शब्दांत केलें. मध्यमवर्गीयांचीं हल्लींचीं सांपत्तिक परिस्थिति खालावल्यामुळें त्यांच्या राहाणींत दिवसेंदिवस कमीपणा कसा येत चालला आहे, हें सांगून समाजांतील या वर्गाचें उच्चाटण झाल्यास राष्ट्राचा कणा मोडल्यासारखें होईल याची जाणीव राज्यकर्त्यांनीं व समाजसुधारकांनीं ठेवली पाहिजे, असाहि इशारा त्यांनीं ह्या प्रसंगीं दिला. बँकेनें आपल्या नोकरांची सांपत्तिक व शैक्षणिक स्थिति सुधारण्याचे दृष्टीनें रौप्यमहोत्सव ग्रंथांत ज्या सूचना संस्थेच्या चालकांना केल्या आहेत त्याकडे बँकेच्या डायरेक्टर-बोर्डाचें लक्ष वेधून त्या सूचना अमलांत आणण्याबद्दल त्यांनीं आग्रहपूर्वक सुचविलें. नोकरवर्गानेंहि आत्मीयतेनें सहकारी चळवळींची सेवा करीत रहावे, असा बहुमोल उपदेश अध्यक्षांनीं सभासदांस व इतरांस केला.

### बँकेच्या चालकांना सूचना

रौप्यमहोत्सव ग्रंथांत सोसायटीच्या प्रगतीचा सुबोध अहवाल देण्यांत आला आहे, व सोसायटीच्या आजवरच्या पदाधिकाऱ्यांची सचित्र माहिती देण्यांत आली आहे. सोसायटीचे सभासद हे बँकेचे कायम नोकर असल्यामुळें, त्यांच्या उन्नतीसाठी बँकेनें काय करावें, ह्याबाबत खालील सूचना प्रस्तुत ग्रंथांत करण्यांत आल्या आहेतः—

( १ ) रिझर्व बँकेनें आपल्या नोकरवर्गाकरितां जशी वसतिगृहाची योजना केली आहे तशींच पुणें सें. को. आपल्या बँकेनें मुख्य कचेरी व शाखा कचेऱ्यांत करावी.

( २ ) नोकरांना त्यांची दहा वर्षांपेक्षा अधिक नोकरी झाल्यास त्यांना प्रॉ. फंडाशिवाय बँकेकडून नोकरीचे मानानें ग्रॅच्युइटीहि देण्यांत यावी. असें केल्यानें नोकर व संस्था यांचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे होतील.

( ३ ) बँकेच्या लायक नोकरांना सहकारी बँकिंगच्या क्षेत्रांतील वरिष्ठ दर्जाचें शिक्षण मिळविण्याचे कामीं प्रोत्साहन व आर्थिक मदत करण्याचें धोरण बँकेनें ठेवावें. तसें झाल्यानें बँकेच्या कामांतहि अधिक कार्यक्षमता येण्यास मदत होऊं शकेल.


# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः-भोर, जि. पुणें.**

**शाखाः-पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — म. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

## किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी

वरील कंपनीला ३१ जुलै, १९५४ अखेर संपलेल्या ३४ व्या वर्षी ४,३१,९९७ रु. घसारा काढून व २,५०,००० रु. कराची तरतूद करून १,१८,४३६ रु. निव्वळ नफा झाला आहे. भागीदारांना ४% डिव्हिडंड देऊन ३०,००० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले आहेत. कंपनीचा व्यवहार वाढला असला, तरी स्पर्धेमुळें नफ्यांत अधिक वाढ होऊं शकलेली नाहीं. कंपनीनें एकूण २९ वर्षें डिव्हिडंड जाहीर केलें आहे, त्यांपैकी १९५२-५३ अखेरच्या २८ वर्षांच्या डिव्हिडंडचे आंकडे ताळेबंदास जोडले आहेत, त्यावरून डिव्हिडंडची वार्षिक सरासरी ७·०४५% पडते. हा तक्ता दिला आहे.

कंपनीच्या स्थापनेपासून भागीदारांना दिलेलें डिव्हिडंड

| वर्ष | डिव्हिडंड व बोनस | % |
|---|---|---|
| १९२०–२१ | १ ला डिव्हिडंड | ६ % |
| १९२१–२२ | २ रा „ | १५ „ |
| १९२२–२३ | ३ रा „ | १५ „ |
| १९२३–२४ | ४ था „ | १५ „ |
| १९२७–२८ | ५ वा „ | ४ „ |
| १९२८–२९ | ६ वा „ | ४ „ |
| १९२९–३० | ७ वा „ | ४ „ |
| १९३०–३१ | ८ वा „ | ४ „ |
| १९३१–३२ | ९ वा „ | ४ „ |
| १९३२–३३ | १० वा „ | ४ „ |
| १९३४–३५ | ११ वा „ | ४ „ |
| १९३५–३६ | १२ वा „ | ४ „ |
| १९३७–३८ | १३ वा „ | ४ „ |
| १९३८–३९ | १४ वा „ | ४ „ |
| १९३९–४० | १५ वा „ | ६ „ |
| १९४०–४१ | १६ वा „ आणि बोनस | ७½ „ |
| १९४१–४२ | १७ वा „ „ | ९ „ |
| १९४२–४३ | १८ वा „ „ | १२ „ |
| १९४३–४४ | १९ वा „ „ | ११ „ |
| १९४४–४५ | २० वा „ „ | ९ „ |
| १९४५–४६ | २१ वा „ „ | १२ „ |
| १९४६–४७ | २२ वा „ „ | १२ „ |
| १९४७–४८ | २३ वा „ „ | १२ „ |
| १९४८–४९ | २४ वा „ „ | १२ „ |
| १९४९–५० | २५ वा „ „ | १४ „ |
| १९५०–५१ | २६ वा „ „ | १४ „ |
| १९५१–५२ | २७ वा „ | ६ „ |
| १९५२–५३ | २८ वा „ | ४ „ |
| | एकूण...... | २३२½ % |
| वार्षिक सरासरी | | ७·०४५ |

**काश्मीरमधील नवा कालवा**—काश्मीरमधील लडाख भागांत एक नवा पाणी-पुरवठ्याचा कालवा चालू वर्षाच्या मध्याला पूर्ण होईल. ह्या भागांतील हा पहिलाच कालवा आहे. कालव्याची लांबी १५ मैल असून तो लेह येथून १५ मैलावर सिंधू नदीपासून काढण्यांत आला आहे. कालव्याला ३·५ लाख रुपये खर्च आला आहे. त्याच्या पाण्यामुळें १,००० एकर रेताड जमिनीला नियमित पाणीपुरवठा होईल.

### आरोग्य राखण्याविषयीं प्रचार

कलकत्ता येथील चित्तरंजन कॅन्सर इस्पितळाला 'क्ष' किरणांचें यंत्रसाहित्य भारतीय सरकारनें देणगीदाखल दिलें आहे. ह्या साहित्यामुळें शरीराच्या आंत खोल असलेल्या भागांचेंहि चित्रीकरण होऊं शकेल. ही भेट देतांना भारतीय सरकारच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर ह्यांनीं असें जाहीर केलें, कीं सरकारतर्फे सेंट्रल हेल्थ ब्यूरो ह्या नांवाची एक संघटना लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. आजार टाळून आरोग्य कसें राखावें ह्यासंबंधीं देशांत प्रचार करण्याचें काम ही संघटना करणार आहे. ह्या विषयासंबंधीं छोटीं पुस्तकें काढणें व इतर प्रचार करणें, असा कार्यक्रम ती अंमलांत आणील. प्रचाराच्या मोहिमेंत शहरें व खेडीं, दोहोंचाहि समावेश करण्यांत येईल. त्या म्हणाल्या, कीं पंचवार्षिक कार्यक्रमांत आरोग्याला योग्य तें स्थान मिळालेलें नाहीं, ही गोष्ट दुःखदायक आहे.. ह्या कामासाठी पुरेसा पैसा नाहीं, अशी सबब सांगण्यांत येते. तथापि, ही सबब पुढारलेल्या देशांतील आरोग्यमंत्रीहि करीत असतात. मी अमेरिकेंत असतांना त्या देशाच्या आरोग्य-मंत्र्यानेंहि पैसा नसल्याची तक्रार केली. अमेरिकेसारख्या देशांत, कीं जेथें पैसा विपुल आहे असें आपण समजतों, तेथेंहि कितीतरी आरोग्यविषयक योजना पैशाच्या अभावीं अंमलांत येऊं शकत नाहींत. कॅन्सरवरील उपचार आणि तत्संबंधीं जें संशोधन चित्तरंजन इस्पितळातर्फे करण्यांत आलें आहे, त्याबद्दल त्यांनीं धन्यवाद दिले. कॅन्सर झालेला असल्याचा संशय ज्या रोग्यांना असेल त्यांनीं उपचारासाठी इस्पितळांत लवकर जावें, असा सल्ला त्यांनीं दिला. ह्या बाबतींत डॉक्टरमंडळींचें साह्य फार महत्त्वाचें आहे, असें त्या म्हणाल्या.

**राजनैतिक प्रतिनिधींचा नवा धंदा**—१९५० सालीं ब्रिटननें कम्युनिस्ट चीनच्या राजवटीला मान्यता दिली. त्यावेळीं लंडन येथें राष्ट्रीय चिनी सरकारची वकिलात होती. ह्या वकिलातीमधील दोघा वरिष्ठ राजनैतिक प्रतिनिधींनीं लंडन शहरांत आतां एक कॉफी गृह चालविलें आहे. वकिलातींत पूर्वीं काम करीत असलेल्या लोकांपैकी ८० टक्के लोक ह्याच व्यवसायांत काम करीत आहेत.

**सुएझ कालवा बंद झाला तर**—सुएझ कालवा वहातुकीला बंद झाला तर किती बोटी अडकून पडतात, ह्याचें प्रत्यंतर नुकतेंच आलें. डिसेंबर ३१ रोजीं कालव्यावरील एक झुलता पूल आणि एक मालवाहू बोट ह्यांची टक्कर झाली. ही बोट १० हजारांवर टन वजनाची असून ती दूर करण्यास एंजिनिअर्सना जवळजवळ आठवडा लागला. येवढ्या अवधींत १५७ बोटी मार्ग नसल्यानें अडकून पडल्या होत्या.

**सरहद्दीच्या संरक्षणासाठी खर्च**—नेपाळच्या उत्तरेकडील सरहद्दीवर पहारा ठेवण्यासाठीं जीं नाकीं ठिकठिकाणीं उभारण्यांत आलीं आहेत, त्यांच्यासाठी नेपाळ सरकारला २० लाखांपर्यंत वार्षिक खर्च करावा लागतो. ह्याच नाक्यांसाठी दोन वर्षांपूर्वी अवघा ३ लाख रुपये वार्षिक खर्च होत असे.

**रशिआ-युगोस्लाव्हिआ व्यापारी करार**—युगोस्लाव्हिआ व रशिआ ह्यांनीं परस्परांत एक वर्ष मुदतीचा व्यापारी करार केला आहे. कराराप्रमाणें उभयता देशांत २ कोटी डॉलर्सचा व्यापार-व्यवहार व्हावयाचा आहे. युगोस्लाव्हिआ रशिआला मांस, तंबाखू, कापड, इत्यादी माल पुरविणार असून रशिआकडून पेट्रोल, छापखाने इत्यादी वस्तू घेणार आहे.

## दक्षिण सातारा जिल्हा सहकारी बोर्ड लि. सांगली

### सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गांच्या परीक्षेचा निकाल

दक्षिण सातारा जिल्हा सहकारी बोर्ड लि. सांगली, या संस्थेच्या विद्यमानें जत येथें ता. १३-९-१९५४ ते १३-११-१९५४ अखेरीस झालेल्या सेक्रेटरी शिक्षणवर्गाच्या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणें जाहीर करण्यांत आला आहे. परीक्षेस ऐकूण २६ विद्यार्थी बसले होते, त्यांपैकीं पहिल्या वर्गांत ४, दुसऱ्या वर्गांत ८ व तिसऱ्या वर्गांत १० असे एकूण २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण ८४.६ आहे.

वर्ग १ ला:—(१) रा. शं. पुरोहीत. (२) शां. वि. आरळी. (३) शा. ह. सराफ. (४) मि. शी. माळी.

वर्ग २ रा:—(१) म. ला. मारवाडी. (२) शा. कृ. माने. (३) बा. न. शेख. (४) बा. गो. नाईक. (५) ल. मी. हट्टी. (६) आ. शि. पाटील. (७) प्र. पां. पाठक. (८) कु. गुजाताई घों. गुर्लहसूर.

वर्ग ३ रा:—रा. ना. कुलकर्णी. (२) शा. आ. गडदे. (३) ह. त. मोकाशी. (४) उ. द्रा. मुल्ला. (५) सौ. हिराबाई शि. शिंदे (६) अ. ला. कोरबु. (७) म. वा. देशपांडे. (८) गो. ह. देसाई. (९) क. ध. हिरगोंड. (१०) शि. गु. हिरमठ.

### राहुरी येथील शिक्षणवर्ग

नगर जिल्हा सहकारी बोर्डानें ता. १-११-५४ पासून राहुरी येथें चालविलेल्या सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या शिक्षण-वर्गाचा समारोप तेथील मामलेदार श्री. कुलकर्णी यांचे अध्यक्षते-खालीं २४-१२-५४ रोजीं साजरा झाला. त्या प्रसंगीं ता. को. सुपरवायझिंग युनियनतर्फे बोलविलेल्या तालुक्यांतील सर्व सोसायट्यांचे प्रतिनिधी व गांवांतील कार्यकर्ती मंडळी हजर होती.

आरंभीं को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख यांनीं शिक्षणवर्गाची थोडक्यांत माहिती सांगितली. त्यानंतर श्री. बाबूराव तनपुरे, श्री. परशराम पाटील व श्री. कुलकर्णी यांनीं सेक्रेटरींना उपदेशपर माहिती दिली. शेवटीं श्री. देशमुख यांनीं जमलेल्या मंडळींचे आभार मानले. तदनंतर पानसुपारी होऊन हा छोटासा समारंभ आटोपला.

सदर वर्ग चालविणेचे कामीं युनियन सुपरवायझर श्री. कन्नूर बँक इन्स्पेक्टर श्री. जयशंकर व सहकारी खात्यांतील सर्व अधिकाऱ्यांनीं फारच मेहनत घेतली.

### सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्ग, खेड

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें तारीख १५-१-५५ पासून मुक्काम खेड, तालुका खेड येथें सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग, पुणें जिल्हा सहकारी बोर्डानें चालविण्याचें ठरविलें आहे. पुणें जिल्ह्यांतील सहकारी अन्ट्रेण्ड सेक्रेटरीज व दुय्यम नोकरवर्ग, व्हर्नाक्युलर परीक्षा पास अगर मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्यांना या वर्गात प्रवेश मिळेल. वर्गात येऊं इच्छि-णारांनीं आपले अर्ज संपूर्ण पत्त्यासह तारीख १३-१-५५ चे आंत मे. को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, पुणें, १४८७ शुक्रवार पेठ, पुणें नं. २ यांचेकडे पाठवावेत. वर्गाची फी रुपये ३ व परीक्षेची फी रुपया १ आहे. अर्जाबरोबरच फी रुपये ३ पाठविली पाहिजे. कोणत्याहि कारणास्तव फी परत केली जाणार नाहीं. या वर्गासंबंधींची आवश्यक ती माहिती वरील बोर्डाकडे अगर खेड तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवाझिंग युनियन लि. खेड, यांचेकडे चौकशी केली असतां मिळूं शकेल.


# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ — पोस्ट बॉक्स नं. ४७२ — तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. | ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,७०,२७,००० |

१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०४,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.